| MHKO050004862007 | **नियमित दिवाणी दावा क्र.६४/२००७.**<br>**नि.क्र.९८ वरील आदेश.**<br>**बाबुराव कृष्णा पाटील व इतर विरुध्द आनंदा मारुती निगडे व इतर.** |
|---|---|

वादीतर्फे प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ४ प्रमाणे मयत वादी क्र.१ व ३ तसेच मयत प्रतिवादी क्र.४, ९ व १३ यांचे प्रस्तुत अर्जात नमूद वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दिलेला आहे.

२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रतिवादी विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल केला असून सदरचा दावा दि.०३/०७/२०१२ रोजी वादी यांच्या गैरहजेरीच्या कारणावरून काढून टाकला होता. त्यानंतर वादी यांनी नक्कला काढून घेऊन दावा पुन्हा फैलावर घेण्यासाठी मा.न्यायालात कि.दि.अ.क्र.४४/२०१२ हा अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज दि.१८/०७/२०२४ रोजी मंजुर होऊन दावा पुन्हा फैलावर घेण्याचा हुकूम झाला. सदर कि.दि.अर्ज प्रलंबित असताना वादी क्र.१ बाबुराव कृष्णा पाटील हे दि.२१/०६/२०१५ रोजी मयत झाले. तसेच वादी क्र.३ दौलतराव दत्ताजी पाटील हे दि.२५/०५/२०१३ रोजी मयत झाले. तसेच प्रतिवादी क्र.४ श्रीमती शेवंता भ्रतार गणपती निगडे तसेच प्रतिवादी क्र.९ अनुसया भ्रतार शंकर जाधव या देखील दि.०२/०७/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. परंतु, त्यांच्या मृत्यूची नोंद इचलकरंजी नगरपालिकेकडे केल्या नाहीत. तसेच प्रतिवादी क्र.१३ मधुकर कृष्णा जाधव हे देखील मयत झाले आहेत. मयत वादी व प्रतिवादी यांचे वारस कि.दि.अ.क्र.४४/२०१२ मध्ये मुदतीत दाखल केले आहेत व ते वारस रेकॉर्डवर आहेत. मात्र प्रस्तुतचे काम बोर्डावर नसल्याने सदर कामात वारस रेकॉर्डवर आणता आले नाहीत. परंतु सदरचे वारस मुळ कामी रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. वादी क्र.१ बाबुराव कृष्णा पाटील व वादी क्र.३ दौलतराव दत्ताजी पाटील यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस आहेत. प्रतिवादी क्र.४ शेवंता भ्र. गणपती निगडे व प्रतिवादी क्र.९ अनुसया शंकर जाधव हे मयत असून त्यांचे मृत्यूची नोंद इचलकरंजी नगरपालिकेकडे केली नाही व तसा दाखला इचलकरंजी नगरपालिकेकडे दिलेला आहे. त्यामुळे त्यांचे अर्जात नमूद वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादी क्र.१३ मधुकर कृष्णा जाधव यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस असलेने त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेचा हुकुम व्हावा. कि.दि.अ.क्र.४४/२०१२ हा अर्ज

दि.१८/०७/२०२४ रोजी मंजूर झाला आहे. सदरचा अर्ज मंजुर झाल्यास मयत वादी व मयत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणार आहेत व न्यायालयास न्यायदानास मदत होणार आहे.

३. सबब वादी यांनी अशी विनंती केली की,

**अ.** सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

**ब.** मयत वादी क्र.१ बाबुराव कृष्णा पाटील, वादी क्र.३. दौलतराव दत्ताजी पाटील, प्रतिवादी क्र.४ शेवंता भ्रतार गणपती निगडे, प्रतिवादी क्र.९ अनुसया भ्रतार शंकर जाधव व प्रतिवादी क्र.१३ यांचे अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेण्याविषयी हुकुम व्हावा.

**क.** वादी क्र.१ बाबुराव कृष्णा पाटील मयत वारस १-अ-१,१-अ-२, १-अ-३, १-अ-४ व १-क हे सहीस उपलब्ध नाहीत. तसेच ते वादीस सामील होणेस तयार नाहीत तरी त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करणेस यावे.

४. प्रतिवादी यांना वारंवार संधी देऊन देखील प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले नाही. सबब, दि.१७/०२/२०२५ रोजी प्रतिवादी विरुध्द विनाम्हणणे आदेश पारीत करण्यात आला.

५. वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान चालू असलेला प्रस्तुत मुळ दावा क्र.६४/२००७ माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांनी दि.०३/०७/२०२२ रोजी खारीज केला होता. त्यामुळे सदर दावा अस्तित्वात नव्हता. दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४४/२०१२ हा वादीने सदर दावा खारीज झाल्यानंतर पुन्हा फैलावर घ्यावा म्हणून दिला होता. तो या न्यायालयाने दि.१८/०७/२०२४ रोजी मंजुर केला आहे. त्यामुळे मयत वादी क्र.१, २ व प्रतिवादी क्र.४, ९ व १३ जे सदर किरकोळ चालू असताना मयत झाले आहेत त्यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे कारण सदरचे वादी व प्रतिवादी हे मुळ दाव्याला म्हणजेच या दाव्याला आवश्यक पक्षकार होते. झालेला विलंब कायदेशीर असल्याने तो या न्यायालयाने माफ केला आहे. त्यामुळे सदर मयतांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी वादीला परवानगी देणे आवश्यक आहे. वादीचे कथन आहे की, वादी क्र.१ बाबुराव कृष्णा पाटील मयत वारस १-अ-१,१-अ-२, १-अ-३, १-अ-४ व १-क हे सहीस उपलब्ध नाहीत. तसेच ते वादीस सामील होणेस तयार नाहीत तरी त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करण्यात यावे. ज्याअर्थी वादी क्र.१ हा मुळ दाव्याला आवश्यक पक्षकार होता त्याअर्थी त्याचे वारस प्रस्तुत दाव्याला आवश्यक पक्षकार आहेत. त्यांना वादी किंवा प्रतिवादी म्हणून सामील केले नाही तर प्रस्तुत दाव्याला आवश्यक पक्षकाराची बाधा येईल. त्यामुळे त्यांना किमान त्यांचे विरुध्द कोणतीही मागणी

नसल्याने प्रतिवादी म्हणून सामील केल्याने त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, पुढीलप्रमाणे आदेश:-

## आ दे श

निशाणी क्र.९८ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो व प्रस्तुत अर्जात नमूद केलेले मयतांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी याद्वारे दाव्यात दुरुस्ती करुन सामील करण्याची परवानगी याद्वारे देण्यात येते. वादीने दाव्यात तशी दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी. मुळ वादी क्र.१ यांच्या वारसांना दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करण्याची परवानगी याद्वारे देण्यात येते.

PATWE DATARAJ GUNAJIRAO
Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2025.04.04 17:29:16 +0530

दि.०४/०४/२०२५.

**(डॉ. डी.जी.पटवे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.